भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.२८४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/०४/२०१७

१) अल्पवयीन मुलाला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :-

दिनांक २१/४/१७ चे ०५.०० वा. दरम्यान यातिल फिर्यादी हे बापु बालक आश्रम येथे अधिक्षक असुन त्यांचे बालक आश्रम येथे अजमेश केशव सेलोकर वय १६ वर्ष हा प्रवेशीत असतांना कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेल्याने फिर्यादी पंकज शामराव सुखदेवे वय ३३ वर्ष रा. मुस्लीम लायब्ररी चौक भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६३ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास स.फौ. महालगावे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

२) कंपाऊडचे बाहेर ठेवलेली,व गेटचा ताला तोडुन आतमध्ये ठेवलेली मोटरसायकल चोरून नेल्याने गुन्हा नोंद :-

दिनांक २२/०४/२०१७ चे २३.३० ते ०५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी यांनी आपले घराचे कंपाऊडचे आत मो.सा.क्र.एमएच ३६ एन ११७५ हिरो होडां स्लेन्डर कि. २०,०००/रू.व घराशेजारील राहणारे शिवदास महादेवराव काळे यांचे घराशेजारील असलेली त्याची मो.सा.क्र.एमएच २० ए.एफ.०१३२ हिरो होडां स्लेन्डर कि.१५,०००/-रू. रात्र दरम्यान बाहेर उभी ठेवलेली कोणीतरी अज्ञात चोराने सुनामौका पाहुन फाटकेचा ताला तोडुन आत ठेवलेली व बाहेर उभी असलेली दोन्ही मोटार सायकल एकुण कि. ३५,०००/-रू. ची चोरून नेल्याने फिर्यादी संदिप जिवण बान्ते वय ३० वर्ष रा. राजीव नगर बेला यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भा.द.वी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि उबाळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

३) शेतात बोरला लावलेली सबमर्सीबल मोटार पंप चोरी केल्याने गुन्हा नोंद:-

दिनांक २०/०४/०१७ चे १९.३० ते २१/४/१७ चे ०६०० वा.दर. यातील फिर्यादीचे शेतात बोरला लावलेली पॅक्चीन कंपनीची ३ एचपी सब मर्सीबल मोटार पंप कुनीतरी अज्ञात चोराने मोटारीला बांधलेल्या रस्त्यात डिलेवरी पाईप केबल वायर कापुन मोटार चोरून घेवुन जाण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी पुंडलीक शंकर हातझाडे वय ४८ वर्षे रा.कोका यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. कारधा येथे कलम ३७९,५११ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.पुढील तपास पो.हवा. ७२६ सेलोकर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

४) मुलीला रस्त्यात थांबऊन,विनयभंग करून गालावर मारून मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:-

दिनांक २२/०४/०१७ चे १०.३० वा. दर. यातील फिर्यादी ही रस्तयाने घरी जात असताना यातिल आरोपीने एकतर्फी प्रेमातुन तिला रस्त्यात थांबवुन तु माझे सोबत का बोलत नाही असे म्हणुन शिवीगाळ करून गालावर दोन, तिन थापडा मारून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे मनात भिती निर्माण झाली असल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. पवनी येथे कलम

३५४,३४१,३२३,५०४,५०६ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि गदादे पो.स्टे.पवनी हे करीत आहेत.

५) विवाहीतेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २२/०४/२०१७ चे १७३५ वा. दरम्यान यातील फिर्यादी ही रोजगार हमीचे कामावर नदीचे पाळीने जात असता यातिल आरोपी हा पुलाखालुन निघुन फिर्यादीचे मागेहुन येवुन झटापटी करून विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३५४(ब)(क),३२३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा.६७७ कठाणे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत

६) ओव्हरटेक करताना नियत्रंण सुटल्याने रोडचे बाजुला असलेल्या झाडाला धडक मारून स्वत:चे मरणास व दोन व्यक्तीला जखमी करण्यास कारनीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २१/०४/२०१७ चे १३.४५ वा. दरम्यान यातील आरोपी मृतक वाहनचालकाने आपले ताब्यातिल वाहन भरधाव वेगाने ,हयगयीने,लापरवाहीने चालवुन गोबरवाही कडुन तुमसर कडे जात असताना काळया पिवळया गाडीला ओव्हरटेक करतांना गाडीवरील नियंत्रण सुटल्याने रोडचे बाजुला असलेल्या झाडाला धडक मारून स्वत:चे मरणास व गाडीत बसलेले फिर्यादी,प्रमिला शामलाल राठोड रा.पिपरवानी,हसंरपा तिलकचंद बमलोटे रा.सुंदरटोला यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी शामलाल चुडामन राठोड वय ६५ वर्ष रा. पिपरवाणी जि.शिवनी यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरून व पो.स्टे. भंडारा येथुन जखमीचे प्राप्त कागदपत्रावरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास स.पो.नि. झोटींग पो.स्टे.गोबरवाही हे करीत आहेत.

७) विदयुंत करंट लागुन जळाल्याने औषधोपचारा दरम्यान मृत्यु . :—

दिनांक १५/०४/२०१७ चे ०९.०० वा. दरम्यान यातील मृतक मृणाल सुर्यभाण मेश्राम वय २७ वर्ष रा. मुरमाडी हा अमित गायधने रा. समर्थ नगर मुरमाडी लाखनी यांचे नविन घराचे बांधकाम सुरू असतांना मृतक हा ठेकेदार विजय गोयल यांचे कडे मजुरीने त्याच घराचे कामाकरिता दिनांक १५/४/१७ चे ०९.०० वा. दर. स्लॅपवर असलेली लोखंडी सलाख उचलण्यासाठी गेला असता स्लॅप समोरून इलेक्ट्रीक मेन लाईन गेलेली असुन त्या लाईनला लोखंडी सलाखचा स्पर्श झाल्याने त्याचे दोन्ही हात ८१ टक्के जळाल्याने त्यास उपचाराकरिता त्याचा भाऊ क्रिष्णा मेश्राम याने प्रथम उपचारा कामी सा.रू. लाखनी येथे नुवन डॉक्टरांनी उपचार करून पुढील उपचारास नागपुर येथे रेफर केल्याने त्यास मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचार दरम्यान दिनांक १५/४/१७ चे २३०० वा. डॉक्टारांनी मृत घोषीत केल्याने पो.स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम

१७४ जा.फौ. चे कागदपत्र पो.स्टे. ला प्राप्त झाल्याने स्वताचे राहते घरी पायरीवरून खाली पडुन डोक्याला मार लागल्याने त्यास औषधोपचारा करिता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो.स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र.००/१७ कलम १७४ जा.फौ. चे कागदपत्र दिनांक २०/४/१७ ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो.हवा.कोसरे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे लाखनी येथे कलम १७४ जाफौ.चा नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.नि.चकाटे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करिता
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.